**ठळक बातम्या**

- महिला आरक्षण, मतदारसंघ फेररचना आणि १३०व्या घटनादुरुस्ती विधेयकावर लोकसभेत आज मतदान
- राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश नारायण सिंग यांची बिनविरोध निवड
- 'नारी शक्ती वंदन अधिनियम' आजपासून लागू झाल्याची अधिसूचना जारी
- इराणबरोबरचं युद्ध लौकरच जिंकणार असल्याचं डोनाल्ड ट्रंप यांचं प्रतिपादन
- आयपीएल मध्ये आज गुजरात टायटन्स आणि कोलकता नाईट रायडर्स यांच्यातला सामना अहमदाबादमधे रंगणार

**आणि**

- देशाच्या विविध भागात उष्णतेची लाट/ काही ठिकाणी पावसाची शक्यता

**<><><><><>**

संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसाच्या कामकाजाला आज दोन्ही सभागृहात सुरुवात झाली. माजी प्रधानमंत्री दिवंगत चंद्रशेखर यांच्या जयंतीनिमित्त संसदेच्या दोन्ही सभागृहात त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

लोकसभेत आज केंद्रशासित प्रदेश दुरुस्ती विधेयक २०२६, संविधानाची १३०वी दुरुस्ती विधेयक तसंच मतदारसंघ पुनर्रचना विधेयक २०२६ या तिन्ही विधेयकांवर चर्चा सुरू झाली. या तिन्ही विधेयकांवर आज दुपारी ४ वाजता मतदान घेतलं जाणार आहे. दरम्यान महिला आरक्षण कायदा २०२३ या कायद्यात दुरुस्ती करण्यासाठीचं विधेयक काल लोकसभेत सादर झाल्यानंतर रात्री उशिरा मंत्रालयाने महिला आरक्षण कायदा २०२३ लागू करण्यासाठी एक अधिसूचना जारी केल्याचं काँग्रेसचे के. सी. वेणुगोपाल यांनी सभागृहाच्या निदर्शनाला आणून दिलं. मूळ कायदा अंमलात आणण्यापूर्वीच त्यात दुरुस्ती विधेयक

आणण्याच्या सरकारच्या निर्णयावर विरोधी पक्ष सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले आणि कायदे मंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्याकडून स्पष्टीकरण मागितलं.

<><><><><>

राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश नारायण सिंग यांची बिनविरोध निवड झाली आहे. केंद्रीय मंत्री आणि सभागृह नेते जगत प्रकाश नड्डा यांनी हरिवंश यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. भाजपा खासदार एस फँगनॉन कोन्याक यांनी अनुमोदन दिलं. ९ एप्रिल रोजी हरिवंश यांचा कार्यकाळ संपल्यानंतर हे पद रिक्त झालं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हरिवंश यांचं अभिनंदन केलं. सलग तिसऱ्यांदा उपाध्यक्ष म्हणून झालेली निवड हा सभागृहाचा हरिवंश यांच्यावरचा ठाम विश्वास दर्शवते, असं मोदी म्हणाले. माजी प्रधानमंत्री चंद्रशेखर यांच्या जयंतिदिनीच त्यांचे सहकारी हरिवंश यांची तिसऱ्यांदा निवड झाल्याचं प्रधानमंत्री मोदी म्हणाले.

- **- - होल्ड - प्रधानमंत्री - -**

विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि इतर पक्षांच्या गटनेत्यांनीही हरिवंश यांचं अभिनंदन केलं.

<><><><><>

१०६ वी घटना दुरुस्ती अधिनियम २०२३ म्हणजेच 'नारी शक्ती वंदन अधिनियम' आजपासून लागू झाल्याची अधिसूचना जारी झाली आहे. २०२३ मध्ये संसदेने हा कायदा संमत केला. या कायद्यामुळे लोकसभा आणि दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्राच्या विधानसभांसह सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश जागा फिरत्या पद्धतीने राखीव ठेवण्याची तरतूद या कायद्यात आहे.

<><><><><>

यापूर्वी लागू न झालेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी नारी शक्ती वंदन अधिनियम विषयीची अधिसूचना जारी करण्यात आल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले. संसद परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते. विरोधी पक्षांनी या प्रकरणाचं राजकारण करू नये असं आवाहनही रिजिजू यांनी केलं.

<><><><><>

महिला आरक्षण कायद्यातल्या दुरुस्तीवरून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या टीकेला द्रमुक नेत्या कनिमोळी यांनी आज प्रत्युत्तर दिलं. आपल्या कपड्यांचा काळा रंग हा काली मातेचा रंग असून द्रमुक या मुद्द्यावर शेवटपर्यंत आंदोलन करत राहील, असं कनिमोळी म्हणाल्या. लोकसभेत काल महिला आरक्षण कायद्यातल्या दुरुस्तीच्या निषेधार्थ द्रमुक पक्ष सदस्यांनी काळ्या रंगाचे कपडे परिधान केले होते. त्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी टीका केली होती. त्याला कनिमोळी यांनी प्रत्युत्तर दिलं.

**<><><><><>**

द्विवार्षिक लष्कर कमांडर परिषद काल नवी दिल्ली इथं पार पडली. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेत, संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनावर भर देण्यासाठी तसंच सध्याच्या पुरवठा साखळीतल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर स्वदेशी उत्पादन क्षमता वाढवण्याच्या आवश्यकतेवर चर्चा करण्यात आली.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर निवडणूक आयोगानं केलेल्या एक हजारांहून अधिक प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांना आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं काल फेटाळली. राज्य सरकार आणि निवडणूक आयोग यांचा परस्परांवर विश्वास नसल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं चिंता व्यक्त केली.

पश्चिम बंगालमधे पहिल्या टप्प्यातलं मतदान येत्या२३ तारखेला होणार असून प्रचार तापला आहे. राज्याचे विरोधी पक्षनेते सुवेंदु अधिकारी यांनी काल पुरुलिया जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या. आसामचे मुख्यमंत्री हिमंता विस्वसर्मा यांनी राज्याच्या उत्तर भागात प्रचार दौरा केला. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही आपल्या तृणमूल काँग्रेसच्या प्रचारासाठी उत्तर बंगालमधील काही जिल्ह्यांमध्ये प्रचार तसंच रोड शो केला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बंगालमधे भाजपाचा प्रचार करत आहेत. तृणमूल काँग्रेसला घुसखोरांची नावं मतदार यादीत घालायची होती, असा आरोप त्यांनी कोलकाता इथल्या प्रचारसभेत केला.

**<><><><><>**

इराणची लष्करी क्षमता मोठ्या प्रमाणात नष्ट झाली आहे. त्यांच्याकडे नौदल शिल्लक राहिलेलं नाही. इराणच्या सामरिक क्षमतांमध्ये लक्षणीय घट झाली असून अमेरिका

इराणविरुद्ध लवकरच विजय मिळवेल, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या शस्त्रसंधी आणि वाटाघाटीच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. इराण हुशार देश आहे, असं सांगत त्यांनी इराणच्या कणखर वृत्तीचं कौतुकही या वेळी केलं.

दरम्यान इराणभोवती नाकेबंदीचा विळखा अमेरिकेने अधिक घट्ट केला आहे. इराणशी संबंधित किंवा इराणला पुरवठा करणाऱ्या कोणत्याही जहाजाला रोखण्याचे निर्देश अमेरिकेने आखातात तैनात केलेल्या सैन्याला दिले आहेत. रोखलेल्या जहाजावरुन जप्त करण्याच्या वस्तूंची भली मोठी यादी या सैन्याला दिली आहे.

<><><><><>

इस्रायल आणि लेबनॉन यांच्यात १० दिवसांची तात्पुरती युद्धबंदी लागू झाली असून लेबनॉनची राजधानी बैरुत इथं या युद्धविरामानंतर जल्लोष करण्यात आला. शहरात फटाक्यांची आतषबाजी करून आनंद साजरा करण्यात आला. उभय देशांदरम्यान राजनैतिक चर्चेसाठी चांगलं वातावरण निर्माण व्हावं यासाठी ही तात्पुरती युद्धबंदी जाहीर करण्यात आली असून काल रात्रीपासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली.

<><><><><>

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉ यांनी काल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. यावेळी मोदी आणि मॅक्रॉ यांनी पश्चिम आशियातील परिस्थितीवर चर्चा करताना होर्मुझची सामुद्रधुनी पार करण्यासाठी त्या भागात सुरक्षा आणि स्वातंत्र्य तातडीनं पूर्ववत होण्याच्या गरजेवर सहमती व्यक्त केली.

<><><><><>

कंपनी (स्थापना) नियम २०१४ च्या पुनरावलोकनासाठी सरकारने हितधारक आणि नागरिकांकडून सूचना मागवल्या आहेत. या सूचना थोडक्यात स्पष्टीकरण देऊन मंत्रालयाच्या संकेतस्थळावरील 'ई-कन्सल्टेशन' मॉड्यूलद्वारे ९ मे पर्यंत पाठवण्याचं आवाहन कंपनी व्यवहार मंत्रालयानं केलं आहे. याबरोबर, कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणी पद्धतीत सुसूत्रता आणण्यासाठी देखील मंत्रालय भागधारकांशी चर्चा करत आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून मंत्रालयाने आपल्या संकेतस्थळावर एक संकल्पना पत्र प्रसिद्ध केलं असून, त्यावर सार्वजनिक सल्लामसलत केली जाणार आहे.

**<><><><><>**

आयपीएल मध्ये आज गुजरात टायटन्स आणि कोलकता नाईट रायडर्स यांच्यात अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडीअममध्ये संध्याकाळी साडेसात वाजता सामना सुरू होईल. काल मुंबई इंडीअन्स आणि पंजाब किंग्स इलेवन यांच्यात झालेल्या सामन्यात पंजाबनं मुंबईला 7 गडी राखून हरवलं.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात तापमान वाढत आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात उष्णतेची लाट आहे.

मात्र पश्चिमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

जम्मू काश्मीरमधे सखल भागात काल जोरदार पाऊस झाला, तर उंचावरच्या भागात हलकी हिमवृष्टी झाली. येत्या रविवारपर्यंत मध्यम ते हलका पाऊस पडण्याची शक्यता असून वादळी पाऊस आणि गारपीट होऊ शकते.

मध्यप्रदेशात उष्णतेचा उच्चांक नोंदला जात असून वाढत्या तापमानामुळे शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. मात्र रविवारच्या आसपास हलका पाऊस पडू शकतो.

राजस्थानातही हवा तापली असून आज संध्याकाळी आणि उद्या पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><>//**